**सुचना - छत्रपती संभाजीनगर जिल्हा होमगार्ड नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक**

छत्रपती संभाजीनगर जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी करीता छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील ज्या रहीवासी उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केला आहे त्यांचेकरीता खालील प्रमाणे नोंदणी कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सदर नोंदणी फक्त छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील रहीवासी उमेदवारांकरीता असून इतर जिल्हयातील ऑनलाईन अर्ज केलेले सर्व उमेदवार सदर नोंदणी करीता अपात्र आहेत. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्हा सोडून इतर जिल्हयातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राहू नये. त्यांना मैदानामध्ये प्रवेश दिला जाणार नाही, तसेच रहिवासी भागातील पथक/उपपथक सोडून इतर पथकात अर्ज केलेले उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणी मध्ये अपात्र ठरतील.

अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणी, शारीरीक पात्रता चाचणी खालील प्रमाणे नमुद कालावधीमध्ये दररोज सकाळी 05.00 वा. खालील प्रमाणे **गोकुळ पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय , पोलीस अधिक्षक ग्रामीण कार्यालय, टी.व्ही.सेंटर जवळ छत्रपती संभाजीनगर** येथे बोलाविण्यात येत आहे. उमेदवारांना सकाळी 05.00 ते सकाळी 09.00 या कालावधीमध्येच मैदानात प्रवेश दिला जाईल.

**पुरुष उमेदवारांकरिता खालील प्रमाणे नमुद वेळापत्रक**

| अ.क्र. | दिनांक | आवेदन क्रमांक पासुन - पर्यंत | | एकुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०.०८.२०२४ | १ | १६५५ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| २ | २१.०८.२०२४ | १६६६ | ३३६७ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| ३ | २२.०८.२०२४ | ३३६९ | ५०७९ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| ४ | २८.०८.२०२४ | ५०८० | ६७६६ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| ५ | २९.०८.२०२४ | ६७६७ | ८४८३ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| ६ | ०३.०९.२०२४ | ८४८४ | १०१७३ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| ७ | ०४.०९.२०२४ | १०१७४ | ११८६२ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| ८ | ०५.०९.२०२४ | ११८६३ | १३५२५ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| ९ | २३.०९.२०२४ | १३५२६ | १५१९८ | १५०० | महिला उमेदवार वगळून |
| १० | २४.०९.२०२४ | १५१९९ | १६२५० | ९१४ | महिला उमेदवार वगळून |

**महिला उमेदवारांकरिता खालील प्रमाणे नमुद वेळापत्रक**

| अ.क्र. | दिनांक | आवेदन क्रमांक पासुन - पर्यंत | | एकुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५.०९.२०२४ | १५ | १२४४८ | १५०० | पुरुष उमेदवार वगळून |
| २ | २६.०९.२०२४ | १२४५७ | १६२४४ | ४८५ | पुरुष उमेदवार वगळून |

टिप -- वरिल प्रमाणे नमुद वेळापत्रकानुसारच पुरुष व महिला उमेदवारांनी हजर रहावे.

# -- उमेदवारांकरिता महत्वाची सुचना --

१. कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता येताना अर्जासह आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वतः स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडावी. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वतः घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील. उमेदवारांना नोंदणीकरीता स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची सुपंर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

२. उमेदवारांना शारिरिक क्षमता चाचणी मध्ये पात्र होणेकरीता प्रत्येक प्रकारामध्ये ४०% गुण मिळविणे आवश्यक राहील. (धावणे या प्रकारात किमान १० गुण व गोळाफेक या प्रकारात किमान ४ गुण आवश्यक.) धावणे चाचणी प्रकारामध्ये अपात्र ठरल्यास गोळाफेक चाचणी घेतली जाणार नाही. मात्र धावणे चाचणीमधील अपात्र उमेदवारांना त्यांचे डिटेल सोबत शेवटपर्यंत थांबावे लागेल व चेस्ट क्रमांक, टोकन इ. जमा करावे लागेल. मध्येच पळून गेलेल्या उमेदवारांवर दंडात्मक कार्यवाही करणेत याची नोंद घ्यावी.

३. उमेदवारांनी कोणत्या किमती वस्तु, मोबाईल इ. आणू नयेत आणि आणल्या तर त्या स्वत्:चे जबाबदारावर सांभाळाव्यात. याची कोणतीही जबाबदारा आयोजकांवर राहणार नाही.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा होमगार्ड नोंदणी-२०२४

४. पथक निहाय रिक्त अनुशेष खालीलप्रमाणे आहे.

१.

| अ.क्र. | होमगार्ड पथक/उपपथक | अनुशेष | | | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | एकूण | |
| १. | छत्रपती संभाजीनगर | ८७ | ४५ | १३२ | छत्रपती संभाजीनगर शहरातील पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व पोलीस स्टेशन **, चिखलठाणा, करमाड, फुलंब्री पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| २. | खुलताबाद | २६ | २१ | ४७ | खुलताबाद पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ३ | कन्नड | २८ | १९ | ४७ | कन्नड शहर, कन्नड ग्रामीण, पिशोर, देवगांव रंगारी पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ४ | सिल्लोड | २६ | ०५ | ३१ | सिल्लोड शहर, सिल्लेड ग्रामीण, वडोदबाजार पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ५ | सोयगांव | ०५ | २७ | ३२ | सोयगांव, अजिंठा, फर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |

| अ.क्र. | होमगार्ड पथक/उपपथक | अनुशेष | | | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | एकूण | |
| ६ | गंगापूर | ४९ | २३ | ७२ | गंगापूर, सिल्लेगांव पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ७ | वैजापूर | ३९ | २५ | ६४ | वैजापूर, शिऊर, विरगांव पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| ८ | पैठण | २२ | १९ | ४१ | पैठण, एम.पैठण, पाचोड, बिडकीन पोलीस स्टेशन हद्दीतील / रहिवासी उमदेवार |
| | **एकुण** | **२८२** | **१८४** | **४६६** | |

सदर होमगार्ड नोंदणी प्रक्रीया अत्यंत पारदर्शक व इन-कॅमेरा पार पाडणेत येणार असुन होमगार्ड नोंदणी करीता उमेदवारांनी कोणत्याही अमिषाला बळी पडू नये. तसेच शिफारस / वशिला इ. गैरमार्गाचा वापर करु नये. होमगार्ड नोंदणी करीता कोणी पैसे लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा. अपर पोलीस अधिक्षक, छत्रपती संभाजीनगर किंवा अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचेकडे तक्रार करावी.

अतिवृष्टीमुळे,हवामान बदलामुळे, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त, प्रशासकिय व्यत्यय आल्यास त्या दिवशीच्या उमेदवारास नंतरचे दिनांक कळविण्यात येईल. तसेच वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याची सुचना https://csn.mahapolice.gov.in/ व https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येईल त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेतस्थळावरील सुचनांकरीता अद्यावत रहावे,

मा. अपर पोलीस अधिक्षक (ग्रा.) तथा
जिल्हा समादेशक, होमगार्ड छत्रपती संभाजीनगर यांचे आदेशान्वे..